Review Of Research
Vol. 3 | Issue.4 | Jan.2014
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभाग वर्धा मधील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन

**प्रा. गोपाल विठोबाजी हेलोंडे[१] , डॉ. प्रदीप डी. घोरपडे[२]**
[१]संशोधनकर्ता
[२]मार्गदर्शक , शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली.

**साराशं**

कोणत्याही उत्पादन अथवा सेवा क्षेत्रात मानवीय घटकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी उत्पादन किंवा सेवा क्षेत्रात मानवीय घटकांचे महत्त्व हे कायम असणार आहे. या दृष्टीने आपण विचार केल्यास प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व्यापक असल्याचे विदर्शनास येते. जगाच्या पाठीवर कोठेही 'मानव' हा घटक कार्यरत असतोच त्यांच्या समस्यांचे, प्रश्नांचे स्वरूप वेगवेगळे असेल असे म्हणता येईल. परंतु त्या समस्येच्या, प्रश्नांच्या जवळ जाणारे हे संशोधन असेल असे मला सांगावेसे वाटते. यास्तव प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभाग वर्धा मधील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन केलेले आहे.

**प्रस्तावना**

देशाचा विकास हा त्या देशातील दळणवळणाच्या साधनांवरच अवलंबून असतो. दळणवळणाचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. जलवाहतूक, हवाईवाहतूक व जमिनीवरील वाहतूक. यात जमिनीवरील वाहतुकीत रेल्वे, खाजगी वाहन, बस इत्यादी साधंनाचा वापर केला जातो. दळणवळणाच्या साधनांमध्ये रेल्वे वाहतुकीने दळणवळणाचा मोठा भार सांभाळला असला तरी देशाच्या कानाकोपऱ्यात ती पोहचु शकत नाही व त्यामुळे वाहतुकीची गरज भरून काढण्यासाठी प्रत्येक राज्यांनी आपल्या स्तरावर दळणवळणाची सेवा सुरू केली. त्यातुनच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची निर्मिती झाली.

'गाव तिथे बस' हे सेवेचे व्रत डोळ्यासमोर ठेवून हे महामंडळ अनेक वर्षांपासून प्रवाशांची सेवा करत आहे. हे अविरत सेवेचे व्रत पूर्ण करीत असतांना महामंडळाच्या प्रबंधकीय व्यवस्थापनात मानवीय घटकांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. म्हणून प्रस्तुत विषयाचे संशोधन करणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते, म्हणुनच संशोधनाकरिता प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची व्याप्ती संपूर्ण राज्यभर असली तरी, प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी राज्यातील वर्धा जिल्ह्यात कार्यरत असलेली महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभाग वर्धा मधील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यात आलेली आहे.

कोणत्याही उपक्रमाच्या उद्दिष्टांची यशस्वीपणे पूर्तता होण्यामध्ये मानवीय संसाधनाच्या कुशल व्यवस्थापनाच्या योगदानाचे विशेष महत्त्व असते. उपक्रमातील इतर सर्व संसाधनांचा महत्तम उपयोग आणि किमान अपव्यय होण्याचे

उद्दिष्ट सुद्धा मानव संसाधनांच्या कुशल व्यवस्थापनावर अवलंबुन असते. शासकीय, निमशासकीय, खाजगी अशा सर्वच उपक्रमांमध्ये मानवी संसाधनांच्या व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष दिल्यास तो उपक्रम यशस्वी होण्यास मदत होईल असे वाटते. म्हणूनच या अध्ययनाची आवश्यकता आहे.

**सारणी क्रमांक १ वाहक व चालक यांची सामाजिक कार्यात सहभागाबाबत माहिती**

| | वाहक | | चलक | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | १३९ | ६१.८ | १६१ | ७१.६ |
| नाही | ८६ | ३८.२ | ६४ | २८.४ |
| एकूण | २२५ | १००.० | २२५ | १००.० |

सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६१.८ टक्के वाहक सामाजिक कार्यात सहभागी होत असून ३८.२ टक्के वाहक सामाजिक कार्यात सहभाग घेत नाहीत.

त्याचप्रमाणे सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७१.६ टक्के चालक सामाजिक कार्यात सहभागी होत असून २८.४ टक्के चालक सामाजिक कार्यात सहभाग घेत नाहीत.

**सारणी क्रमांक २ वाहक व चालक यांची सामाजिक कार्यात सहभागी न होण्याबाबत माहिती**

| | वाहक | | चलक | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| वेळ न मिळणे | ७९ | ३५.१ | ५९ | २६.२ |
| आवड नसणे | २ | ०.९ | १ | ०.४ |
| कार्यक्रमातील गटबाजी | ५ | २.२ | ४ | १.८ |
| उत्तर न देणाऱ्यांची संख्या | १३९ | ६१.८ | १६१ | ७१.६ |
| एकूण | २२५ | १००.० | २२५ | १००.० |

सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३५.१ टक्के वाहक वेळ मिळत नसल्यामुळे सामाजिक कार्यात सहभाग घेत नसून कार्यक्रमातील गटबाजी व आवड नसल्यामुळे सामाजिक कार्यक्रमात सहभाग न घेणाऱ्या वाहकांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे २.२ टक्के व ०.९ टक्के असल्याचे आढळले.

त्याचप्रमाणे२६.२ टक्के चालक वेळ मिळत नसल्यामुळे सामाजिक कार्यात सहभाग घेत नसून १.८ टक्के चालक कार्यक्रमातील गटबाजींमुळे तसेच आवड नसल्यामुळे ०.४ टक्के चालक सामाजिक कार्यातसहभाग घेत नसल्याचे आढळते.

**सारणी क्रमांक ३ वाहक व चालकांकडे देवदेवकी व धार्मिक सण साजरे करण्यासंबंधी माहिती**

| | वाहक | | | | चालक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | टक्के | नाही | टक्के | होय | टक्के | नाही | टक्के |
| देव–देवकी | १२३ | ५४.६ | १०२ | ४५.४ | १८५ | ८२.२ | ४० | १७.८ |
| धार्मिक सण | १८३ | ८१.३ | ४२ | १८.७ | २०१ | ८९.३ | २४ | १०.७ |

सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५४.६ टक्के वाहकांकडे देवदेवकी करीत असून, देवदेवकी करीत नाही हे नमूद करणाऱ्या वाहकांचे शेकडा प्रमाण ४५.४ टक्के असल्याचे आढळते. तसेच ८१.३ टक्के वाहकांकडे धार्मिक साण साजरे करीत असून १८.७ टक्के वाहकांकडे धार्मिक सण साजरे केले जात नाही.

त्याचप्रमाणे ८२.२ टक्के चालकांकडे देवदेवकी करीत असून देवदेवकी करीत नाही हे नमूद करणाऱ्या चालकांचे शेकडा प्रमाण १७.८ टक्के असल्याचे आढळले. तसेच ८९.३ टक्के चालकांकडे धार्मिक साण साजरे करीत असून १०.७ टक्के चालकांकडे धार्मिक सण साजरे केले जात नाही.

**सारणी क्रमांक ४ वाहक व चालकांद्वारे बारसे, तेरवी, लग्न करण्याच्या प्रकारासंबंधी माहिती**

| | वाहक | | चलक | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| कर्ज काढून | १३१ | ५८.२ | १७४ | ७७.३ |
| ब्चतीतून | ९४ | ४१.८ | ५१ | २२.७ |
| एकूण | २२५ | १०० | २२५ | १००.० |

सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५८.२ टक्के वाहक कर्ज काढून बारसे, तेरवी, लग्न करीत असून बचतीतून बारसे, तेरवी, लग्न साजरे करणाऱ्या वाहकांचे शेकडा प्रमाण ४१.८ टक्के असल्याचे आढळले.

त्याचप्रमाणे ७७.३ टक्के चालक कर्ज काढून बारसे, तेरवी, लग्न करीत असून बचतीतून बारसे, तेरवी, लग्न साजरे करणाऱ्या चालकांचे शेकडा प्रमाण २२.७ टक्के असल्याचे आढळले.

**सारणी क्रमांक ५ वाहक व चालकांना व्यसन असण्यासंबंधी माहिती**

| | वहक | | चलक | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | ३० | १३.३ | ४३ | १९.१ |
| नाही | १९५ | ८६.७ | १८२ | ८०.९ |
| एकूण | २२५ | १०० | २२५ | १००.० |

सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८६.७ टक्के वाहकांना व्यसन नसून १३.३ टक्के वाहकांना व्यसन असल्याचे निदर्शनास आले.

त्याचप्रमाणे८०.९ टक्के चालकांना व्यसन नसून १९.१ टक्के चालकांना व्यसन असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ६ वाहक व चालकांना असलेल्या व्यसनांसंबंधी त्यांच्या प्रतिक्रिया**

| | वहक | | चलक | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| मद्यपान | ४ | १.८ | ६ | २.७ |
| धुम्रपान | २१ | ९.३ | ३२ | १४.२ |
| अन्य | ३ | १.३ | १ | ०.४ |
| मटका/जुगार | २ | ०.९ | ४ | १.८ |
| उत्तर न देणाऱ्यांची संख्या | १९५ | ८६.७ | १८२ | ८०.९ |
| एकूण | २२५ | १००.० | २२५ | १००.० |

सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ९.३ टक्के वाहकांना धुम्रपानाचे व्यसन असून १.३ टक्के वाहकांना अन्य प्रकारचे व्यसन असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १.८ टक्के व ०.९ टक्के वाहकांना अनुक्रमे मद्यपान व मटका/जुगारव्यसन असल्याचे निदर्शनास आले. तसेच ८६.७ टक्के वाहकांनी त्यांना व्यसन नसल्याची माहिती दिलेली आहे.

त्याचप्रमाणे १४.२ टक्के चालकांना धुम्रपानाचे व्यसन असून प्रत्येकी २.७ टक्के व १.८ टक्के चालकांना मद्यपान व मटका/जुगारव्यसन असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे केवळ ०.४ टक्के चालकांना अन्य प्रकारचे व्यसन असून ८०.९ टक्के चालकांनी त्यांना व्यसन नसल्याची माहिती दिलेली आहे.

**निष्कर्ष**

१. प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश वाहक व चालक नियमितरित्या सामाजिक कार्यात सहभागी होतात.
२. अध्ययन क्षेत्रातील बहुतांश वाहक व चालक वेळ मिळत नसल्यामुळे नियमितरित्या सामाजिक कार्यक्रमात सहभाग घेत नाहीत.
३. अध्ययन क्षेत्रातील बहुतांश वाहक व चालकांकडे देव–देवकी करीत असून बहुतांश वाहक व चालकांकडे धार्मिक सण साजरे केल्या जातात.
४. अध्ययन क्षेत्रातील बहुतांश वाहक व चालक बारसे, तेरवी, लग्न कर्ज काढून साजरे करतात.
५. अध्ययन क्षेत्रातील बहुतांश वाहक व चालकांना व्यसन नाही.
६. अध्ययन क्षेत्रातील बहुतांश वाहक व चालकांना धुम्रपानाचे व्यसन आहे.

**संदर्भ सूची**

१. Dixit Dr. K. R.- Essentials Of Business Procedures & Practices, Vishwa publishers & Distributers, First Edition, January 2000.
२. Singh B. P. & - Essentials of Management, Kitab Chhabra T. N. mahal, Allahabad, Sixth Edition, 1986.
३. शाह डॉ. पी. के., तातेड डॉ. बी. डी.– प्रबन्ध अवधारणा एवं संघटनात्मक व्यवहार, साहित्य भवन पब्लिकेशन्स, संशोधित संस्करण.
४. शर्मा. डॉ. के. के., सुराणा प्रो. जी. सी., शर्मा. डॉ. अरुण– मानव संसाधन प्रबन्ध, प्रकाशक, रमेश बुक डिपो, आर. बी. डी. पब्लिशिंग हाऊस, जयपूर, नई दिल्ली,२०१३–१४.
५. देशमुख डॉ. प्रभाकर, देशमुख डॉ. रविंद्र प्रभाकर– मानवी संसाधन व्यवस्थापन, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, आवृत्ती, जून २०१३.
६. बोधनकर डॉ. सुधीर, वेखंडे प्रा. अविनाश– प्रबंधनातील मानवीय घटक, अनुप पब्लिशिंग हाऊस, महाल, नागपूर, प्रथम आवृत्ती,१९८७-८८.
७. कानेटकर डॉ. मेधा, पाटील डॉ. मिलिंद– मानव संसाधन व्यवस्थापन, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, १९ सप्टेंबर २०१३.
८. बोधनकर डॉ. सुधीर,कानेटकर डॉ. मेधा– मानव संसाधनाचे व्यवस्थापन, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती,ऑगस्ट २०१२.
९. बिराजदारे प्रा. डॉ. शैला टी.,बिराजदारे प्रा. विश्वजीत टी.–भारतीय अर्थव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन्स् धुळे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २०१४.
१०. website :www.marathivishwakosh.in
११. माहोरे डॉ. रा. य. – समष्टी अर्थशास्त्र, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००३.